**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे








वर्ष ५ । अंक २८१ । शनिवार ८ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


# मनपाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यावर दर्गादायरा परिसरात जीवघेणा हल्ला

## प्रकृती चिंताजनक । एक आरोपी अटकेत, तिघांचा शोध सुरू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मुकुंदनगरमधील दर्गादायरा परिसरात विद्युतीकरणाचे काम करण्यासाठी गेलेल्या महापालिका कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला झाल्याचा धक्कादायक प्रकार काल, शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडला. धीरज परदेशी (वय २२) असे हल्ला झालेल्या कर्मचाऱ्याचे नाव असून त्याच्यावर सध्या शहरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, या प्रकरणी पोलिसांनी युनूस शेख या आरोपीला अटक केली असून तिघेजण फरार झाले आहेत. त्यांचा युद्धपातळीवर शोध सुरू आहे.

महापालिकेतर्फे विद्युतीकरणाचे काम करण्यासाठी नेमलेल्या कंत्राटदाराकडे धीरज परदेशी हा कामास होता. शुक्रवारी सायंकाळी मुकुंदनगरमधील दर्गादायरा परिसरात परदेशी हा विद्युतीकरणाचे काम करण्यासाठी गेला असता ■ पान ४ वर

### एसपींचे शहरातील नागरिकांना आवाहन



संबंधित घटनेतील एका आरोपीला पोलिसांनी तातडीने अटक केली असून, उर्वरित आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. नागरिकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास न ठेवता पोलीस प्रशासनास सहकार्य करावे व शहरात शांतता राखावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले आहे.

### महापालिका कर्मचाऱ्यांचे मुकुंदनगरमध्ये काम बंद

महापालिका कंत्राटी कर्मचाऱ्यावर हल्ला झाल्याने महापालिका कर्मचाऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत असून या प्रकरणातील सर्व चारही आरोपींना अटक करून कठोर कारवाई करावी अशी मागणी महापालिका कर्मचाऱ्यांनी केली आहे. ही कारवाई होत नाही तोपर्यंत मुकुंदनगरमध्ये महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या सर्व सेवांवर कर्मचाऱ्यांनी बहिष्कार टाकला असून, काम बंदचा इशारा देण्यात आला आहे.

# जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी रुपये जमा - ना.विखे पाटील

## आधार प्रमाणीकरणामध्ये राज्यात प्रथम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही राज्य शासनाची अत्यंत महत्वाकांक्षी योजनेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला असून, कर्जमुक्ती योजनेच्या ऑनलाईन लाभ वितरणास प्रारंभ होऊन पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ६९७.८१ कोटी रक्कम वर्ग करण्यात आली असल्याची माहिती जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत दूरदृष्य प्रणाली द्वारे झालेल्या कर्ज वितरण शुभारंभास मंत्री विखे यांच्यासह जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मंगेश सुरवसे सहभागी झाले होते. अहिल्यानगर जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी ८१ लाख २५ हजार १३९ रुपये एवढी रक्कम वर्ग करण्यात आली असल्याची माहिती पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे.

राज्यातील शेतकरी हा राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहे. मात्र, अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर यासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे काही वेळेस पिकांचे नुकसान होते. त्यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. त्यामुळे बाधित शेतकरी शेती कर्जाची मुदतीत परतफेड करू शकत नाही. असे शेतकरी थकबाकीदार झाल्यामुळे त्यांना बँकाकडून नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊ शकत नाही. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली होती.

त्यानुसार जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी ८१ लाख २५ हजार १३९ रुपयांचा लाभ देण्यात आला. ही रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करण्यात आली. यात अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ६५ हजार ६५६ शेतकरी सभासदांना ६२२ कोटी ७४ लाख रुपये एवढ्या कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. तसेच अन्य राष्ट्रीयकृत बँकांमधील सहा हजार ९०३ शेतकरी सभासदांना ७५ कोटी ०७ लाख २५ हजार १३९ रुपये रकमेच्या कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे.

राज्य शासनाने सर्व बँकांना कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना तातडीने खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून शेतकऱ्यांना नव्याने शेतीसाठी आर्थिक बळ मिळेल. पहिल्या यादीतील ज्या पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप पूर्ण झालेले नाही, त्यांचे प्रमाणीकरण पूर्ण होताच त्यांच्या कर्जखात्यांवरही लाभाची रक्कम टप्प्याटप्प्याने हस्तांतरित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील उर्वरित शेतकऱ्यांनीही आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

**शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार हा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला होता त्याची वचनपूर्ती होत असल्याबद्दल मंत्री वाखे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करून आभार मानले आहेत.**

दरम्यान, या योजनेत जिल्ह्यातील एकूण २ लाख ३३ हजार ७११ शेतकरी खातेदारांची माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. पहिल्या यादीत १ लाख ३२ हजार ५९१ पात्र शेतकऱ्यांच्या समावेश आहे. त्यापैकी १ लाख १५ हजार ६९२ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेले आहे. त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणिकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. ८ हजार ३६३ शेतकऱ्यांनी अद्यापही फार्मर आयडी काढलेला नाही अशा शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी काढावा तसेच जे मयत खातेदार आहेत अशा खात्यांच्या बाबतीत त्यांच्या वारसाने विकास संस्थेकडे, बँकेकडे वारसाची नोंद लावून घ्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी केले आहे.

# एलसीबीकडून जामखेड येथे तीन गोवंशीय जनावरांची सुटका

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जामखेड शहरातील कुरेशी मोहल्ला परिसरात गोवंशीय जनावरांची कत्तल करण्याचा डाव स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने उधळून लावला आहे. या कारवाईत तीन गोवंशीय जनावरांची सुटका करण्यात आली असून एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. दिनांक ७ ऑगस्ट रोजी जामखेडमधील मोहंमदिया मशिदीजवळील पत्र्याच्या शेडमध्ये गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी डांबून ठेवल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली.

पथकाने छापा कारवाईत सकलेन कदीर कुरेशी (वय २४, रा. कुरेशी मोहल्ला, जामखेड) ■ पान ४ वर



महापालिका कंत्राटी कामगारावर मुकुंदनगरमध्ये जीवघेणा हल्ला; मनपा कर्मचारी युनियन आक्रमक

# हल्लेखोरांवर कडक कारवाईची मागणी; २४ तासांत कारवाई न झाल्यास मुकुंदनगरमधील नागरी सुविधा बंद करण्याचा इशारा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या विद्युत विभागातील कंत्राटी कर्मचारी धीरजसिंग राजपूत यांच्यावर मुकुंदनगर परिसरात काम करीत असताना दहा ते बारा जणांनी जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात जखमी झालेल्या राजपूत यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती मिळताच महापालिका कर्मचारी युनियनच्या वतीने महापालिका प्रशासकीय इमारतीसमोर आंदोलन करून घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. हल्लेखोरांवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

मुकुंदनगर परिसरात महापालिकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना वारंवार दमदाटी, शिवीगाळ तसेच कामात अडथळा आणण्याचे प्रकार घडत असल्याचा आरोप कर्मचारी युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी केला. कर्मचाऱ्यांवर अशा प्रकारे हल्ले होत असतील तर त्यांनी नागरिकांना नागरी सुविधा कशा द्यायच्या, असा सवाल उपस्थित करत हल्लेखोरांवर कारवाई न झाल्यास मुकुंदनगर परिसरातील नागरी सुविधा बंद करण्याचा इशारा युनियनच्या वतीने देण्यात आला.

यावेळी मनपा कर्मचारी युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल, सचिव आनंद वायकर, जितेंद्र सारसर, कैलास चावरे, बाळासाहेब गंगेकर, विजय कोतकर, किशोर कानडे, गुलाब गाडे, बलराज गायकवाड, सोमनाथ सोनवणे, सतीश ताठे, सोनू चौधरी यांच्यासह महापालिका कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बाबासाहेब मुदगल म्हणाले की, महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी नगरकरांना विविध नागरी सुविधा देण्यासाठी सातत्याने काम करीत आहेत. मात्र, काम करीत असताना कर्मचाऱ्यांवर हल्ले होणे ही गंभीर आणि निषेधार्ह बाब आहे. मुकुंदनगर परिसरात कर्तव्य बजावत ■ पान ४ वर

# सव्वादोन लाखांचे १५ गहाळ मोबाईल मूळ मालकांना परत

## मिरजगाव पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गहाळ झालेल्या एकूण सव्वादोन लाख रुपये किंमतीच्या १५ विविध कंपन्यांच्या मोबाईलचा यशस्वी शोध घेऊन ते त्यांच्या मूळ मालकांच्या स्वाधीन करण्याची उल्लेखनीय कामगिरी मिरजगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने केली आहे.



सुवर्णा कांबळे, रोहिणी मानकर, सुनंदा व्यवहारे, संदीप रोटे, हर्षवर्धन घोडके, स्वप्निल माने, तुकाराम जगताप, योगेश जाधव, विश्वनाथ तोरडमल, सचिन पांडुळे आणि प्रवीण शिंदे या नागरिकांनी त्यांचे मोबाईल हरवल्याबाबत मिरजगाव पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या होत्या.

या तक्रारींची दखल घेत वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले. या पथकाने तांत्रिक माहिती व गोपनीय सूत्रांच्या आधारे कौशल्याने तपास करत विविध कंपन्यांचे मोबाईल हस्तगत केले आणि नागरिकांना परत केले.

ही कामगिरी पोलीस ■ पान ४ वर

महिलांच्या मागणीला आमदार दातेंचा तातडीचा प्रतिसाद!

# अवघ्या आठ दिवसांत 'कासारे ते वाघदरा रस्ता' कामाला सुरुवात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** कासारे ते वाघदरा, वाफारेवाडी शिवरस्ता खडीकरण व मजबुतीकरण करण्याच्या महत्त्वपूर्ण कामाचा शुभारंभ आ. काशिनाथ दाते सर यांचे शुभहस्ते पार पडला. आठ दिवसांपूर्वी वाघदरा-कासारे परिसरातील पंधरा ते विस महिला भगिनींनी पारनेर येथे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या जनसंपर्क कार्यालयात त्यांची भेट घेऊन या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. महिलांनी मांडलेल्या या प्रश्नाची तातडीने दखल घेत आमदार दाते सरांनी संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा केला आणि अवघ्या आठ दिवसांत 'मौजे कासारे येथील कासारे ते वाघदरा ते वाफारेवाडी शिवरस्ता खडीकरण व मजबुतीकरण करणे' या कामाचा प्रत्यक्ष शुभारंभ झाला.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले, ''काही दिवसांपूर्वी वाघदरा परिसरातील महिला माझ्याकडे या रस्त्याच्या अडचणी घेऊन आल्या होत्या. त्यांनी मांडलेल्या प्रश्नाची तातडीने दखल घेत संबंधित विभागाकडे पाठपुरावा केला. त्यामुळे आज अवघ्या आठ दिवसांत या रस्त्याच्या खडीकरण व मजबुतीकरणाच्या कामाचा शुभारंभ होत आहे. नागरिकांनी विश्वासाने आपले प्रश्न माझ्याकडे मांडावेत; ते प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे,'' असे त्यांनी सांगितले. कासारे गावामध्ये आजपर्यंत झालेल्या विकासकामांपैकी सुमारे ९५ टक्के कामे माझ्या माध्यमातून मार्गी लागलेली आहेत,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

''रस्ते, पाणी, वीज आणि इतर मूलभूत सुविधांबाबत नागरिकांनी मांडलेले प्रश्न केवळ आश्वासनांपुरते न ठेवता ते प्रत्यक्ष कामाच्या माध्यमातून सोडविणे, हीच माझी भूमिका असून त्या समस्यांवर प्रशासनाच्या माध्यमातून मी निश्चितच येत्या काळात कायमस्वरूपी पर्याय उपलब्ध करून देईल,'' ■ पान ४ वर

# विद्यार्थ्यांनी घर व परिसरातील पाणीसाठ्यांची तपासणी करावी - आयुक्त डांगे

## प्रभाग २ मध्ये 'डेंग्यू मुक्त अहिल्यानगर' अभियानाचा शुभारंभ; जनजागृतीला वेग । शालेय विद्यार्थी, आशा सेविका व आरोग्य सेविकांकडून नाट्य, भारूड व गीतांच्या माध्यमातून डेंग्यूबाबत प्रबोधन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून गेल्या तीन वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेल्या 'डेंग्यू मुक्त अहिल्यानगर' अभियानाच्या माध्यमातून शहरामध्ये डेंग्यू आजाराबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. या अभियानामुळे नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली असून डेंग्यूच्या रुग्णसंख्येतही घट झाली आहे. अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने प्रभाग क्रमांक २ मध्ये 'डेंग्यू मुक्त अहिल्यानगर' अभियानाचा शुभारंभ आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते करण्यात आला.



यावेळी मनपा महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती वर्षा सानप, नगरसेवक निखिल वारे, नगरसेविका संध्याताई पवार, नगरसेविका रोशनीताई त्रिंबके, माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, सुनील त्रिंबके, डॉ. विजय देशपांडे, डॉ. सुदाम रानडे, डॉ. मनोहर देशपांडे, शारदा पोखरकर, योगेश पिंपळे, डॉ. वृषाली आरु, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. आरती डापसे, आकाश त्रिंबके, धीरज उकिरडे आदी उपस्थित होते.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू झाले असून साठलेल्या स्वच्छ पाण्यामध्ये डेंग्यूच्या डासांची ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### पायी दिंडीच्या परतीच्या प्रवासात नगरमध्ये ठाणगे परिवारा कडून पूजा व महाप्रसाद



**अहिल्यानगर- नगरमध्ये त्र्यंबकेश्वर येथील श्री संत निवृत्तीनाथ महाराज आषाढी वारी साठी पंढरपूरला जाणाऱ्या पायी दिंडी जाताना नगरमध्ये मुक्कामी असते व येताना हि मुक्कामी असते,पालखीचा परतीचा प्रवास मध्ये पंढरपूर ते त्र्यंबकेश्वर पायी दिंडी परत जाते, आज नगरमधील सिद्धीबाग येथे पायी दिंडी आली असता पालखीचे ठाणगे परिवाराच्या वतीने स्वागत करण्यात आले व पालखीचे पूजन करण्यात आले.यावेळी अंबादास ठाणगे,शरद ठाणगे, भरत ठाणगे,दिलीप पांढरे, मा.नगरसेविका ऊषाताई शरद ठाणगे , शंकरराव ठाणगे,शिवदत्त पांढरे आदींसह अनेक मान्यवर व भाविक मंडळी उपस्थित होती दिंडीप्रमुख राठी महाराज,अध्यक्ष साळुंके महाराज,पुजारी जयंत महाराज गोसावी व अनिल महाराज गोसावी,मानकरी मोहन महाराज बेलापूरकर,निवृत्ती चोपदार,बैलजोडीचे मानकरी अश्वचे मानकरी आदीचे शाल, श्रीफळ देऊन स्वागत केले पालखी पूजनानंतर नालेगाव येथील ठाणगे मळ्यात सर्व वारकर्यांना व भाविकांना महाप्रसाद जेवण ठाणगे परिवाराच्या वतीने देण्यात आले.ठाणगे परिवाराच्या वतीने कै.नामदेवराव चिमाजी ठाणगे हे सेवा करत होते ते वयाच्या १७ वर्षपासून जेवण देत होते ते १०३ वर्षे जगले व गेली ९१ वर्षे हि सेवा अखंड चालू आहे व पुढेही चालत राहील असे शरद ठाणगे यांनी सांगितले ते म्हणाले पूर्वी परतीच्या प्रवासात १ हजार च्या वर वारकरी असत आता संख्या कमी झाली आहे पण या वर्षी हि संख्या वाढत आहे.पण आम्ही जाताना ज्या उत्साहाने लोक स्वागत करतात त्याच पद्धतीने परतीला आम्ही स्वागत , पूजा महाप्रसाद करतो दिंडी मुक्कामाच्या ठिकाणी मनपाच्या वतीने स्वच्छता,आरोग्य सुविधा देण्यात आल्या तर कोतवाली पोलीस स्टेशन ने बंदोबस्त ठेवला होता.**

# नेप्ती विद्यालयात गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेशाचे वाटप

### परिस्थिती अडचणीची असली तरी शिका – मनोज पवार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रतिनिधी नगर तालुक्यातील नेप्ती येथील श्री स्वामी आण्णा हजारे शिक्षण संस्थेच्या नेप्ती विद्यालयात माजी विद्यार्थी तथा सामाजिक कार्यकर्ते मनोज चिंतामण पवार यांनी पुढाकार घेतला. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वह्या, पेन, दप्तर यांसह विविध शैक्षणिक साहित्य तसेच शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले.

स्वतः ज्या विद्यालयात शिक्षण घेतले, त्याच विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेत त्यांना मदतीचा हात देण्याचा प्रयत्न मनोज पवार यांनी केला. शैक्षणिक साहित्य आणि गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणातील आवश्यक साहित्यापासून कोणताही विद्यार्थी वंचित राहू नये, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

यावेळी संस्था संचालक दिलीप होळकर, केडगावचे केंद्रप्रमुख भगवान बोरुडे, सामाजिक कार्यकर्ते मनोज पवार, रामदास फुले, अमोल चौगुले, महेश पवार, पोलीस पाटील अरुण होले, गोरख जपकर, अजित कोतकर, नानासाहेब होळकर, मुख्याध्यापक बाबा भोर, नानासाहेब घोडके, संतोष खरमाळे, गोरक्ष कोतकर, बाबूलाल सय्यद ,सविता कोरडे, श्रद्धा भांड, अश्विनी पवार, शिवाजी जाधव यांच्यासह शिक्षक, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

आर्थिक परिस्थिती ही विद्यार्थ्यांच्या शिक्षणासमोर अडथळा ठरू नये. परिस्थिती कितीही कठीण असली तरी विद्यार्थ्यांनी शिक्षणाची कास सोडू नये. आजच्या स्पर्धेच्या युगात ज्ञान, कौशल्य आणि मेहनतीच्या जोरावर आपले भविष्य घडविता येते. आपण ज्या विद्यालयातून घडलो, त्या विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांसाठी काहीतरी करता येणे ही माझ्यासाठी अभिमानाची आणि समाधानाची बाब आहे.

विद्यार्थ्यांनी मिळालेल्या शैक्षणिक साहित्याचा योग्य उपयोग करून मन लावून अभ्यास करावा. आई–वडिलांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि समाजाकडून मिळणारा आधार यांचे भान ठेवून आपल्या आयुष्यात मोठे ध्येय निश्चित करावे. प्रत्येक सक्षम व्यक्तीने आपल्या परिसरातील गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पुढे येणे आवश्यक आहे. परिस्थिती अडचणीची असली तरी शिक्षण थांबू नका असे प्रतिपादन सामाजिक

श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त

# सरस्वती हॉस्पिटलच्या वतीने १२ ऑगस्ट पर्यंत महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकीतून सरस्वती हॉस्पिटल, भोपळे गल्ली माळीवाडा यांच्या वतीने महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर दि शुक्रवार ०७ ऑगष्ट पासून ते बुधवार दि १२ ऑगष्ट पर्यंत दररोज दुपारी ३ ते ५ या वेळेत सरस्वती हॉस्पिटलमध्ये होणार आहे अशी माहिती हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. अमोल जाधव यांनी दिली.

सरस्वती हॉस्पिटल आणि श्री संत सावता महाराज उत्सव समिती यांच्या वतीने महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन उत्सव समितीचे प्रमुख छबूनाना जाधव यांच्या हस्ते करण्यात आले .यावेळी सरस्वती हॉस्पिटलचे डॉ अमोल जाधव ,दत्ता जाधव आदेश जाधव डॉ प्राजक्ता उत्सव समितीचे ह भ प जालिंदर महाराज निकम ,सतीश डागवाले ,सुभाष राऊत, बाळासाहेब पुंड ,अनिल चेडे ,श्रीहरी ढवळे, प्रकाश मुळे ,मानसी जाधव ,उज्वला शेरकर प्रतिभा केळकर, सावेरी सत्रे ,कावेरी सत्रे ,डॉक्टर ऐश्वर्या डागवाले ,किरण लोंढे ,मनोज गाडळकर ,ओंकार शिंदे, वसंत होले ,गौरी सातपुते ,सुनीता पोतदार ,पायल बनसोडे आदी उपस्थित होते

''महिलांचे आरोग्य हे कुटुंबाच्या सुदृढतेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. परंतु बहुतेक वेळा महिलांकडून स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे त्यांच्या आरोग्याचा प्राथमिक टप्प्यावर आढावा घेणे गरजेचे असते. या शिबिराच्या माध्यमातून आम्ही महिलांना मोफत तपासणीची सुविधा उपलब्ध करून देत आहोत,'' असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

यावेळी बोलताना डॉ अमोल जाधव म्हणाले कि श्री संत सावता महाराज उत्सव समिती दरवर्षीप्रमाणे सप्ताहाचे आयोजन करत असते या धार्मिक सप्ताहाला आरोग्याची जोड लागावी म्हणून आमच्या सरस्वती सुपर मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटलच्या वतीने आम्ही दरवर्षी मोफत महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करत असतो तसेच सवलतीच्या दरामध्ये शस्त्रक्रिया केली जातील असे त्यांनी सांगितले तसेच यावेळी या अत्याधुनिक अशा हॉस्पिटलमध्ये वेगवेगळ्या सुविधा या रुग्णांसाठी देण्यात आलेले आहेत शिबिरात विविध तपासण्या व मार्गदर्शन केले जाणार आहे.महिलांनी या संधीचा लाभ घ्यावा,'' असे आवाहनही त्यांनी केले.

# समर्पण चातुर्मासात रविवारी २.५ कोटी सामूहिक नवकार महामंत्र जाप कार्यक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रद्धा, भक्ती आणि आत्मकल्याण असा त्रिवेणी संगम असलेला उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांचा समर्पण चातुर्मास आनंदधाम परिसरात अतिशय भक्तीभावाने संपन्न होत आहे. तब्बल १७ वर्षांनंतर पूज्य प्रविणऋषीजी महाराज आपल्या गुरूदेवांच्या पावन भूमीत चातुर्मास करत असल्याने भाविकांमध्ये अलोट उत्साह पहायला मिळत आहे. आचार्यश्रीजी आनंदऋषीजी म.सा.यांच्या १२७ व्या जन्म

जयंतीनिमित्त श्री गुरू आनंद जन्मोत्सव सप्ताह साजरा होत आहे. याअंतर्गत उपाध्यायश्रीजींच्या सान्निध्यात रविवार दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७ ते १० यावेळेत आनंद तीर्थ समवशरण येथे सपरिवार २.५ कोटी नवकार महामंत्र जाप होणार आहे. २५ हजारांहून अधिक भाविक एकाचवेळी नवकार महामंत्राचा सामूहिक जाप करणार आहेत. यावेळी मध्यप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचे उपसचिव आय.ए.एस. सुधीर कुमार कोचर यांचे जाहीर व्याख्यान होणार आहे, अशी माहिती समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया व कोषाध्यक्ष विलास कटारिया यांनी दिली.



यावेळी महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा., पूज्य आलोकऋषीजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा., महासतीजी पूज्य सत्यप्रभाजी म.सा., महासतीजी पूज्य अमितज्योतीजी म.सा. आदी साधूसाध्वीजी उपस्थित असणार आहेत. २.५ कोटी नवकार महामंत्र जाप हा समर्पण चातुर्मासातील ऐतिहासिक क्षण ठरणार आहे. यावेळी भाविकांनी ग्लासभर पाणी सोबत आणायचे आहे. नवकार महामंत्र जापाची ऊर्जा या पाण्यात उतरते. अनुष्ठान झाल्यानंतर सदर पाणी श्रद्धेने प्राशन करायचे आहे. नवकार महामंत्र आत्मशक्ती जागृत करणारा आणि वातावरण मंगलमय करणारा मंत्र आहे. या मंत्रामुळे निर्माण होणारी अद्भुत अशी सकारात्मक ऊर्जा अद्वितीय असणार आहे. आचार्यश्रींच्या पवित्र भूमीत होणारा हा कार्यक्रम संस्मरणीय ठरेल. जास्तीत जास्त भाविकांनी यात सहभागी होऊन समर्पण चातुर्मासात मनोभावे आराधना करावी.

श्री गुरू आनंद जन्मोत्सव सप्ताहात सोमवार दि. १० ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० यावेळेत आनंद एकासन, मंगळवार दि.११ व बुधवार दि. १२ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता आनंद दया, बुधवार दि. १२ ऑगस्ट रोजी दुपारी २ ते ४ यावेळेत तपस्वींचा सामूहिक भावा आणि रात्री ८ वाजता भक्ती संध्या कार्यक्रम होईल.

# फिरोदिया शिवाजियन्स आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत सेक्रेटहार्ड कॉन्व्हेंट आणि आर्मी पब्लिक स्कूलची दमदार कामगिरी

### रंगले चुरशीचे सामने; विविध गटांत एकतर्फी विजय । आराध्य, अंशुमन, माहीर, सिद्धी, प्रांजल, अजय आणि वेदांत यांची गोलांची आतषबाजी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत गुरुवारी (दि. ६ ऑगस्ट) अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर विविध वयोगटांतील सामने उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. शालेय खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक समन्वय, आक्रमक खेळ आणि भक्कम बचावाचे दर्शन घडवत प्रेक्षकांची वाहवा मिळवली. दिवसभर झालेल्या सामन्यांमध्ये सेक्रेटहार्ड कॉन्व्हेंट स्कूल आणि आर्मी पब्लिक स्कूलच्या संघांनी दमदार कामगिरी करत प्रतिस्पर्धी संघांवर एकहाती वर्चस्व गाजवले.



सकाळच्या सत्रात १४ वर्षांखालील मुलांच्या गटात पोदार स्कूल आणि सेक्रेटहार्ड कॉन्व्हेंट स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात सेक्रेटहार्ड कॉन्व्हेंट स्कूलने १–० गोलने विजय मिळवला. सामन्याच्या पाचव्या मिनिटाला आराध्य ॲथनी याने शानदार गोल करून संघाचे खाते उघडले. त्यानंतर सेक्रेटहार्डच्या बचावफळीने भक्कम कामगिरी करत पोदार स्कूलला शेवटपर्यंत एकही गोल करू दिला नाही आणि विजय निश्चित केला.

१६ वर्षांखालील मुलांच्या गटात पोदार स्कूलविरुद्ध सेक्रेटहार्ड कॉन्व्हेंट स्कूलने ५–० अशा दणदणीत फरकाने विजय मिळवला. अंशुमन विधाते याने चौथ्या मिनिटाला गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. त्याने पुन्हा २२ व्या मिनिटाला दुसरा गोल करत संघाची पकड अधिक मजबूत केली. त्यानंतर माहीर गुंदेचा याने उत्कृष्ट आक्रमक खेळाचे प्रदर्शन करत २७ व ३७ व्या मिनिटाला दोन गोल केले. जोएल साठे याने ३९ व्या मिनिटाला गोल करत विजयावर शिक्कामोर्तब केले. सेक्रेटहार्डच्या भक्कम बचावामुळे पोदार स्कूलला एकही गोल करता आला नाही.

१६ वर्षांखालील मुलींच्या गटात आर्मी पब्लिक स्कूल आणि श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात आर्मी पब्लिक स्कूलच्या मुलींनी ४–० असा शानदार विजय मिळवला. सिद्धी पोटे हिने १५ व्या मिनिटाला पहिला गोल केला. त्यानंतर प्रांजल हिने २० व ४८ व्या मिनिटाला दोन गोल करत संघाची आघाडी अधिक भक्कम केली. शर्वरी हिने २४ व्या मिनिटाला गोल करत विजयात मोलाची भर घातली. श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूलला संपूर्ण सामन्यात एकही गोल करता आला नाही.

१२ वर्षांखालील मुलांच्या गटात आर्मी पब्लिक स्कूलने श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूलवर २–० असा विजय मिळवला. मोहित याने सामन्याच्या प्रारंभीच गोल करत संघाचे खाते उघडले, तर समीर याने ८ व्या मिनिटाला दुसरा गोल करत विजय निश्चित केला. या सामन्यातही आर्मी पब्लिक स्कूलच्या बचावफळीने प्रतिस्पर्ध्यांना गोल करण्याची एकही संधी दिली नाही.

दुपारच्या सत्रात १४ वर्षांखालील मुलांच्या गटात आर्मी पब्लिक स्कूल आणि श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूल यांच्यातील सामना रंगला. या सामन्यात आर्मी पब्लिक स्कूलने ३–० गोलने विजय मिळवत सकाळच्या पराभवाची भरपाई केली. अजय सांगळे याने अप्रतिम खेळाचे प्रदर्शन करत ११, ४० व ४६ व्या मिनिटाला गोलांची हॅट्ट्रिक नोंदवली आणि संघाला दिमाखदार विजय मिळवून दिला.

दुपारच्या सत्रातील १६ वर्षांखालील मुलांच्या गटात आर्मी पब्लिक स्कूलने श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूलवर ३–० असा विजय मिळवला. वेदांत गवळी याने १६ व १९ व्या मिनिटाला सलग दोन गोल करून संघाला मजबूत आघाडी मिळवून दिली.

## शब्दकोडे क्रमांक : २५



**आडवे शब्द :** १. अवकाशातून यात्रा करण्यासाठी वापरतात ते यान ४. सावकार ८.गुपित ९. घुसळून केलेली डाळ १०. पुण्यातील एक प्रसिद्ध बाग १३. हिराच्या काट्यांची झाडू १४. नगर १५. अंतर १९. संगीत सप्तकातील पाचवे स्वर २०. वड २१. खड्डा २३. थंड २५. कंकड २७. हिंदीत-टोमॅटो २९. मग- उलट लिहा ३१. पाताळ ३३.एक महिना ३४. दशानन ३६. हिरवे वाटाणे ३७. चौक ३८. स्त्री ३९. गोडाऊन ४१. मात ४२. चणे, कुरमुरे वैगरे मिसळून तयार होणारे खाद्य पदार्थ ४३. हिंदीत- भांडे ४६. चहा पिण्यासाठी वापरतात ४८. हाक ४९. वसा जो चालवतो तो ५०. भीमाचे आयुध ५२. एक हिंदी सिनेमा '** बाज ' ५३. तांबूल ५४. सांडपाणी वाहून नेणारी पळी ५५. लग्नाची मिरवणूक **उभे शब्द :** १. तब्बू, अनिल कपूर यांचा एक सिनेमा २ गुर्मी ३. चोरी करणारा ५. वस्ती ६. ध्येयाची आस ७. मनाचा निश्चय ९. तराव- उलट लिहा ११. रड १२. राशींची एकूण संख्या १३. नासलेल्या खोबऱ्याची चव १६. माती उपसण्याचे एक साधन १७. गोलाकार उठलेले वादळ १८. हिंदीत - पत्र २२. लक्ष्मी २३. मुंडके २४. बंध २५. धोकादायक २६. अमेरिकेची अवकाश संशोधन संस्था २८. ताजा ३०. माठ ३१. युद्ध ३२. वादळाचा फटका ३५.खाली - विरुद्ध ३७. विनाकारण ३९. माराचे वण ४०. एक चिवट पदार्थ ४२. दोन गोष्टींमधील अंतर ४४. जीवा ४५. वस्तू, जिन्नस ४७. पीठ मळण्याचे पात्र ४८. वल्कल ४९. महाल ५१. जुगारातील खेळी

**शब्दकोडे क्रमांक : २४ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | र | ता | वा | | वि | नो | द | | भ | र | डा |
| रे | ती | | ता | क | | व्हे | | क | र | म | |
| ड | | त | ह | | सा | ब | र | म | ती | | आ |
| | क | र | त | ल | | र | | र | | का | म |
| सा | ह | स | | गा | ठ | | नो | | स | | रा |
| व | र | | आ | न | | बा | | न | व | ला | ई |
| ळा | | भां | ग | | खो | ब | रे | | त | ल | |
| | पा | | री | या | ल | | व | सा | | च | ढ |
| चा | ल | क | | क | | मो | ती | | हो | | ग |
| र | | र | या | | का | ळी | | ना | | बे | |
| | भा | व | | दे | व | | बो | क | ड | | ह |
| ती | | ली | न | | ड | म | रू | | गा | र | वा |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### महिलांचा सन्मान हा राजकारणाचा नव्हे, संस्कारांचा विषय- ॲड. स्वाती जाधव



अहिल्यानगर - महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार यांच्याविषयी करण्यात आलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा शिवसेना महिला आघाडीच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे. शिवसेना महिला आघाडीच्या नेत्या स्वाती जाधव यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात महिलांचा सन्मान हा राजकारणाचा विषय नसून तो आपल्या संस्कारांचा आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग असल्याचे स्पष्ट केले. अँड स्वाती जाधव म्हणाल्या की, कोणत्याही पक्षाच्या महिला नेत्या असोत किंवा समाजातील कोणतीही महिला, त्यांच्याविषयी अपमानास्पद किंवा अवमानकारक भाषा वापरणे हे अत्यंत निषेधार्ह आहे. महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार यांच्याबाबत करण्यात आलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा शिवसेना महिला आघाडी जाहीर आणि तीव्र निषेध करते.महिलांचा अपमान हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अपमान असून, अशा प्रकारच्या वक्तव्यांना कोणत्याही परिस्थितीत समर्थन दिले जाणार नाही. महिलांचा स्वाभिमान, सुरक्षितता आणि सन्मान जपण्यासाठी शिवसेना महिला आघाडी कायम ठामपणे उभी राहील, असेही त्यांनी नमूद केले. यापुढे कोणत्याही महिला नेत्या किंवा सर्वसामान्य महिलांविषयी अवमानकारक वक्तव्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणीही अँड स्वाती जाधव यांनी केली. त्यांनी सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि नागरिकांना महिलांविषयी आदराची भूमिका कायम ठेवण्याचे आवाहन केले.

### जनगणना मधील शिक्षकांचे प्रलंबित मानधन तातडीने द्या

अहिल्यानगर- जनगणनाच्या पहिल्या टप्प्यात शासनाच्या आदेशानुसार जबाबदारी पार पाडलेल्या शिक्षकांचे प्रलंबित मानधन व वेतन तात्काळ अदा करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक, शिक्षकेतर सेना यांच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी जिल्हाधिकारी यांना देऊन त्वरित कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय क्रमांक जनगणा-२२२६/ प्र.क्र.१७/विकासअ, दिनांक १ जुलै २०२६ अन्वये जनगणना-२०२७ च्या पहिल्या टप्प्यातील कामकाजासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त यांच्यामार्फत वितरित करण्यास मंजुरी दिली आहे. या शासन निर्णयामध्ये जनगणना अधिकारी, कर्मचारी, प्रगणक, पर्यवेक्षक यांचे मानधन, प्रशिक्षण, प्रवास भत्ता आणि इतर खर्चासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे.अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक शिक्षकांनी शासनाच्या आदेशानुसार जनगणना-२०२७ चे काम अत्यंत जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे पूर्ण केले. मात्र शासनाकडून निधी उपलब्ध होऊनही संबंधित शिक्षकांना अद्याप मानधन किंवा वेतन अदा करण्यात आलेले नसल्याची बाब गंभीर असून त्यामुळे शिक्षकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### शिवरस्त्याचे अतिक्रमण हटविण्याऐवजी जेसीबीने बनवला नवाच रस्ता

अहिल्यानगर- शिवरस्त्यावरील (पाणंद रस्ता) अतिक्रमण हटवण्याऐवजी महसूल प्रशासनाने थेट जेसीबीच्या साहाय्याने शेजारच्या खाजगी शेतजमिनीतूनच नवा रस्ता तयार केल्याचा धक्कादायक प्रकार अहिल्यानगर तालुक्यातील अरणगाव -खंडाळा येथे समोर आला आहे. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य सरकार व महसूल प्रशासनाचे कडक शब्दांत कान उपटले असून, ''प्रथमदर्शनी खाजगी प्रतिवादींनी शिवरस्त्यावर अतिक्रमण केल्याचे स्पष्ट दिसत आहे,'' असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी आणि न्यायमूर्ती आबासाहेब डी. शिंदे यांच्या खंडपीठासमोर मारुती लक्ष्मण आमले व इतर (रिट याचिका क्र. ७०८१/२०२६) तसेच सुनील दत्तात्रय दौंड (रिट याचिका क्र. ९३२२/२०२६) यांच्या याचिकांवर ३ ऑगस्ट २०२६ रोजी सुनावणी झाली. तहसीलदार, अहिल्यानगर यांनी उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाकडून ३१ जुलै २०२६ रोजी जागेची प्रत्यक्ष पाहणी व मोजणी करून शिवरस्ता मोकळा केल्याचा अहवाल छायाचित्रांसह न्यायालयात सादर केला होता. मात्र, याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. अमोल कारभारी गवळी यांनी न्यायालयात कागदपत्रांसह स्पष्ट केले की, ''प्रशासनाने मूळ शिवरस्त्यावरील खाजगी प्रतिवादींचे अतिक्रमण हटवलेच नाही. उलटपक्षी, अतिक्रमणदारांनी उभारलेल्या कंपाउंड वॉलच्या बाजूला जेसीबीने दुसराच रस्ता तयार करून दिशाभूल केली आहे.''

# राज्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत अनुराधा मिश्रा यांची सुवर्ण कामगिरी

## पाच सुवर्णपदके आणि 'स्ट्राँग वूमन ऑफ महाराष्ट्र २०२६'सह ठरल्या विविध किताबांचे मानकरी




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरातील पॉवरलिफ्टर अनुराधा रत्नेश मिश्रा यांनी राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत दैदिप्यमान कामगिरी करत पाच सुवर्णपदके आणि पाच मानाच्या ट्रॉफी पटकावून अहिल्यानगरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. देवनार कॉलनी, गोवंडी (मुंबई) येथे छत्रपती संभाजीनगर सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धा२०२६ मध्ये त्यांनी विविध गटांमध्ये वर्चस्व गाजवत 'स्ट्राँग वूमन ऑफ महाराष्ट्र' या मानाच्या किताबांसह उल्लेखनीय यश संपादन केले.

ही स्पर्धा ॲम्युचर पॉवरलिफ्टिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने आयोजित करण्यात आली होती. राज्यभरातील नामांकित पॉवरलिफ्टर्सनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या वातावरणात झालेल्या स्पर्धेत अनुराधा मिश्रा यांनी आपल्या ताकद, तांत्रिक कौशल्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर सर्वांचे लक्ष वेधून घेत अनेक गटांत सुवर्णपदकांची कमाई केली.

स्पर्धेत त्यांनी मास्टर स्ट्राँग वूमन ऑफ महाराष्ट्र २०२६, मास्टर स्ट्राँग वूमन ऑफ महाराष्ट्र (बेंच प्रेस) २०२६, सिनिअर स्ट्राँग वूमन ऑफ महाराष्ट्र (बेंच प्रेस) २०२६, मास्टर स्ट्राँग वूमन ऑफ महाराष्ट्र (डेडलिफ्ट) २०२६ आणि सिनिअर स्ट्राँग वूमन ऑफ महाराष्ट्र (डेडलिफ्ट) २०२६ हे मानाचे किताब पटकावत पाच सुवर्णपदके आणि पाच ट्रॉफींवर आपले नाव कोरले.

अनुराधा मिश्रा यांनी यापूर्वीही आशियाई पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय यश मिळवले आहे. सातत्यपूर्ण मेहनत, कठोर सराव आणि जिद्दीच्या बळावर त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली असून, राज्यस्तरावरील या यशाने त्यांच्या कारकिर्दीत आणखी एक मानाचा टप्पा गाठला आहे.

या उल्लेखनीय यशामागे महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते तुषार दारकर, सचिव तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते संतोष शिंदे आणि राष्ट्रीय पंच (नॅशनल रेफरी) निशा शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनुराधा मिश्रा यांनी आपल्या तांत्रिक तयारीत सातत्याने सुधारणा करत उत्कृष्ट कामगिरी केली. अनुराधा मिश्रा या सध्या सावेडी येथील 'जिम स्ट्राईकर' येथे प्रशिक्षक स्वप्निल मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करत आहेत. त्यांच्या या यशामध्ये पती रत्नेश मिश्रा यांचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन मिळत आहे. राज्यस्तरीय स्पर्धेतील या दैदिप्यमान कामगिरीमुळे मिश्रा यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# रोजगार निर्मिती आणि देशाच्या सर्वसमावेशक विकासात उद्योजकांची भूमिका महत्त्वपूर्ण - नरेशकुमार दुबे

## एमएसएमई क्रेडिट आउटरीच कॅम्प उत्साहात संपन्न । सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या उत्कृष्ट ग्राहकांचा बँकेच्या वतीने स्मृतीचिन्ह देऊन गौरव

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** भारतीय अर्थव्यवस्थेत सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योगांचे एमएसएमई क्षेत्राचेच मोठे योगदान असून एमएसएमई देशाचा आर्थिक पाठीचा कणा आहे. रोजगार निर्मिती आणि देशाच्या सर्वसमावेशक विकासात उद्योजकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. असे प्रतिपादन सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे यांनी केले. सेंट्रल बँक ऑफ इंडिया अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने एमएसएमई उद्योजकांसाठी एमआयडीसी येथे आमी च्या सभागृहा आयोजित एमएसएमई क्रेडिट आउटरीच कार्यक्रमात उद्योजकांना दुबे यांनी मार्गदर्शन केले यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी आमी चे अध्यक्ष जयरथ खकाळ, उपाध्यक्ष सतीश गवळी ,राजेंद्र सुखरे ,सचिव प्रफुल्ल पारीख ,शाखाधिकारी सुनील विधाटे आर्दीस उद्योजक बँक अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना दुबे म्हणाले की १९११ मध्ये भारतीयांनी सुरू केलेली सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही पहिली भारतीय बँक असून देशभारत ५,५०० हून अधिक शाखांच्या माध्यमातून बँक सेवा देत आहे. आत्मनिर्भर भारत या संकल्पनेला बळ देण्यात एमएसएमई क्षेत्राचा मोलाचा वाटा आहे.एमएसएमई क्षेत्र केवळ व्यवसाय करत नसून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करत आहे. इस्रोसारख्या संस्थांना लागणाऱ्या सुट्या भागांचे उत्पादन घेतले जाऊ लागले आहे.उद्योजकांच्या व्यवसायाची सुरुवात,विस्तार,आधुनिकीकरण आणि खेळत्या भांडवलाची गरज पूर्ण करण्यासाठी बँकेच्या विविध योजना आहेत. त्याचा ग्राहकांनी लाभ घ्यावा व आपला उद्योग व्यवसाय वाढवावा असे आवाहन यावेळी दुबे यांनी केले या कॅपमध्ये सूक्ष्म उद्योग, लघु उद्योग आणि मध्यम उद्योगासाठी जवळपास ८० करोड च्या कर्जाचे वितरण करण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी आमी चे अध्यक्ष जयरथ खकाळ म्हणाले की उद्योजकांनी केवळ भांडवलावर अवलंबून न राहता बँकेत आपली पत जपली पाहिजे. कर्जाची वेळेवर परतफेड केल्यास बँका नेहमीच उद्योजकांना आर्थिक सहाय्य करण्यास तत्पर तयार असतात. लहान व मध्यम उद्योजकांच्या प्रगतीसाठी, व्यवसायाच्या विस्तारासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही नेहमी आपल्या पाठीशी उभी आहे त्यासाठी पत आणि विश्वासार्हता महत्त्वाची असून उद्योजकांनी बँकेत पत निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. वेळेवर कर्जफेड केल्यास भविष्यात बँकेकडून मदत मिळण्यात कोणतीही अडचण येत नाही.

सेंट्रल बँकेच्या माध्यमातून नवीन आणि लहान उद्योजकांना सहकार्य केले जात असून, दुबे सर आणि त्यांची टीम उद्योजकांना सक्षम करण्यासाठी बँकेच्या विविध योजनेच्या माध्यमातून कर्जरूपी आर्थिक सहाय्य पुरवत आहे. त्याचा उद्योजकांनी आपल्या व्यवसाय वाढीसाठी उपयोग करून घ्यावा.

# वाढदिवसाचा उत्सव समाजाच्या सेवेसाठी; पंडितराव चांदगुडे यांच्या पुढाकारातून मोफत आरोग्य शिबिर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**कोपरगाव–** वाढदिवस म्हटला की शुभेच्छा, सत्कार आणि आनंदाचा सोहळा हे चित्र सर्वसाधारणपणे पाहायला मिळते. मात्र, आपल्या आनंदाचा दिवस समाजासाठी उपयोगी ठरावा आणि गरजू नागरिकांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळावा, या सामाजिक जाणिवेतून गोदावरी विकास प्रतिष्ठानचे संस्थापक श्री. पंडितराव यादव राव चांदगुडे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त एक कौतुकास्पद आणि समाजोपयोगी उपक्रम आयोजित केला आहे.

आरोग्य हीच खरी संपत्ती मानून चांदगुडे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना विविध आरोग्य तपासण्या आणि वैद्यकीय मार्गदर्शन सहज उपलब्ध व्हावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

या शिबिराचे आयोजन रविवार, ९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत करण्यात आले असून, गोदावरी संकुल क्र. ०१ समोर, चास (नळी), तालुका कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे हे शिबिर होणार आहे.

या शिबिरात नेत्र तपासणीसह मोफत चष्मे वाटप, डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी आवश्यक मार्गदर्शन आणि नाशिक येथे जाण्यासाठी विनामूल्य वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

तसेच सर्वसाधारण आजारांवरील तपासणी व उपचार, महिलांची व बालरोग तपासणी, रक्त तपासणी, ब्लड ग्रुप तपासणी, बीएसएलआर यासह विविध आरोग्य सुविधा नागरिकांना मोफत मिळणार आहेत. त्याचबरोबर रक्तदाब तपासणी आणि आवश्यक आरोग्य मार्गदर्शनाची सुविधाही उपलब्ध राहणार आहे. या शिबिरासाठी डॉ. वैभव कडुळे आणि डॉ. पूजा कडुळे स्त्रीरोग तज्ज्ञ यांची वैद्यकीय सेवा उपलब्ध असणार आहे. पंडितराव चांदगुडे यांचा हा उपक्रम केवळ वाढदिवसाचा कार्यक्रम न राहता, समाजातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणारा एक विधायक आणि प्रेरणादायी उपक्रम ठरत आहे. वाढदिवसानिमित्त समाजाला काहीतरी देण्याची त्यांची ही संकल्पना निश्चितच कौतुकास्पद असून, अशा समाजोपयोगी उपक्रमांमुळे सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ होते. परिसरातील नागरिकांनी या मोफत आरोग्य शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मंगल भक्त सेवा मंडळाचा शिक्षण कार्यात हातभार - पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे

## १०० गरीब, गरजू, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना वह्या व शालेय दप्तर वाटप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**टाकळी ढोकेश्वर –** समाजात अनेक गरजू आणि होतकरू विद्यार्थी आर्थिक अडचणी मुळे शिक्षणापासून वंचित राहतात. अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणाऱ्या सेवाभावी संस्थापैकी मंगल भक्त सेवा मंडळ हे एक आहे. म्हणून या मंडळाचा अहिल्यानगर जिल्ह्यात शिक्षण कार्यात प्रत्येक वर्षी मोठा हातभार लागतो असे प्रतिपादन ढोकेश्वर विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी केले.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री ढोकेश्वर विद्यालयात १०० गरीब, गरजू, हुशार व होतकरू अशा ढोकेश्वर विद्यार्थी वसतिगृहातील, आदर्श विद्यार्थी वसतिगृह तसेच बालगृहातील विद्यार्थ्यांना शालेय दप्तर व वहयांचे वाटप करण्यात आले त्या प्रसंगी बाळासाहेब निवडुंगे बोलत होते.

या प्रसंगी मंडळाचे सेवेकरी बंडूनाना सप्रे, संतोष व्यवहारे, अमोल मच्चा, प्रितम गांधी, अमोल गिते उपस्थित होते. एम. आय. डी. सी. अहिल्यानगर येथील श्री राजाभाऊ कोठारी अध्यक्ष असलेले मंगल भक्त सेवा मंडळ दरवर्षी वसतिगृहातील विद्यार्थी, ग्रामीण भागातील विद्यार्थी यांना शालेय वस्तूंचे वाटप करीत असते. या वर्षी देखील मंडळाने जिल्ह्यातील अनेक प्राथमिक, माध्यमिक शाळांतील विदयार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप केले.

या कार्यक्रमच्या वेळी रविंद्र मते, निलम खिलारी, वैशाली गायखे, कल्पना जाधव, सुमन वाळुंज, प्रिया डव्हणे, सुरेखा ठाणगे, सोनल रोहकले, निलेश पाचर्णे, नारायण शेळके, श्रीरंग धामणे, संदीप खिलारी, मिनाक्षी पवार, विष्णू भद्रे, सोनाली माळवदे, शिरीष राऊत, पवन कुटे, भाऊसाहेब बांबेरे, नारायण हरेल,अमोल गोरे, सुनिता घोडके इत्यादी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब जाधव यांनी केले तर आभार अतुल सैद यांनी मानले.

# आयुर्वेद, आरोग्य विज्ञान व क्लिनिकल चाचण्यांवर अहमदनगर महाविद्यालयात मार्गदर्शन

## संशोधनाला चालना; विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व अत्याधुनिक प्रयोगशाळा उपकरणांचे वितरण



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** बी.पी. एच.ई. सोसायटीच्या अहमदनगर महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभाग, जॉन बार्नाबस पदव्युत्तर जैवशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. २५ जुलै २०२६ रोजी आयुर्वेद, आरोग्य विज्ञान व क्लिनिकल चाचण्या या विषयांवर व्याख्यान व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून आयुर्वेदातील पारंपरिक ज्ञानाचा आधुनिक संदर्भ, क्लिनिकल चाचण्यांचे नियोजन, संशोधनाची शास्त्रीय पद्धत आणि संशोधन प्रकाशनाच्या विविध टप्प्यांबाबत प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन मिळाले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे सचिव मा. श्री. विशाल बार्नाबास यांच्या हस्ते झाले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अभिजित कुलकर्णी, उपप्राचार्य प्रा. डॉ. भालसिंग, प्रा. डॉ. नाबदे व प्रा. डॉ. बेदरकर, विना-अनुदान विभाग समन्वयक डॉ. रझाक, महाविद्यालयाच्या निबंधक श्रीमती भिंगारदिवे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रसाद लामरुड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. प्रशांत कटके यांनी, तर आभार प्रदर्शन डॉ. वंजारे यांनी केले.

उद्घाटन समारंभात अहमदनगर महाविद्यालयाच्या जैवविज्ञान विभागाचे मानद सल्लागार तथा संस्थेचे विश्वस्त डॉ. मनोहर फुर्ताडो, तसेच संस्थेचे विश्वस्त डॉ. सदाशिव लोणकर आणि डॉ. प्रियांका थोलार यांच्या हस्ते संशोधन क्षेत्रात कार्यरत विद्यार्थ्यांना प्रत्येकी रुपये २५ हजार शिष्यवृत्ती आणि प्रयोगशाळेतील उपकरणांचे वितरण करण्यात आले. यामध्ये अनुजा भालेराव, रिझवान खान, गोविंद सी. निकम (प्राणीशास्त्र विभाग), सदाफ सय्यद (वनस्पतिशास्त्र विभाग) आणि लिकू डेव्हासे (रसायनशास्त्र विभाग) यांचा समावेश होता. या उपक्रमामुळे संशोधन क्षेत्रात कार्यरत विद्यार्थ्यांना आर्थिक तसेच प्रयोगशाळा पातळीवर आवश्यक असलेले पाठबळ मिळाले.

तसेच वैज्ञानिक संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल डॉ. अविनाश वंजारे, डॉ. प्रशांत कटके, डॉ. राजेश टाक आणि डॉ. सनी रुपवते यांचा विशेष गौरव करण्यात आला. डॉ. वंजारे व डॉ. कटके यांनी ब्रेकिओपॉड्स विषयक संशोधनात महत्त्वपूर्ण शोधनिबंध प्रकाशित करून संशोधन अनुदान प्राप्त केले आहे. डॉ. राजेश टाक आणि डॉ. सनी रुपवते यांनी जॉन बार्नाबस पदव्युत्तर जैवशास्त्र विभागातील केंद्रीय उपकरण सुविधा केंद्रासाठी अत्याधुनिक उपकरण खरेदीसाठी क्रोमॅटोग्राफी सोसायटी ऑफ इंडिया कडून रु. १५ लाखांचे अनुदान मिळविले.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियात महिलांचा मोठ्या संख्येने प्रवेश

## पाथर्डी, राहुरी, कोपरगाव व नगर शहरात संघटनात्मक विस्ताराला बळ; महिला आघाडी अधिक सक्षम करण्याचा निर्धार । ताई पगारे यांची कोपरगाव तालुकाध्यक्षपदी नियुक्ती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाच्या संघटनात्मक विस्तारासाठी सुरु असलेल्या पक्ष बांधणी उपक्रमांतर्गत पाथर्डी, राहुरी, कोपरगाव तसेच नगर शहरातील महिलांनी पक्षात जाहीर प्रवेश केला. या पक्षप्रवेशामुळे जिल्ह्यातील महिला आघाडीला अधिक बळ मिळणार असून आगामी काळात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी महिला कार्यकर्त्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याची भूमिका रिपाइंचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के आणि महिला शहर जिल्हाध्यक्षा ज्योतीताई पवार यांनी मांडली.

पक्षात प्रवेश करणाऱ्या महिलांचे स्वागत करून रिपाईच्या वतीने सत्कार करण्यात आला. पक्षाच्या विचारधारेवर विश्वास व्यक्त करीत सामाजिक न्याय, समता आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी काम करण्याचा निर्धार यावेळी नव्याने पक्षात दाखल झालेल्या महिलांनी व्यक्त केला. या प्रवेश कार्यक्रमात ताई पगारे यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) च्या कोपरगाव तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. ताई पगारे यांच्या नेतृत्वाखाली कोपरगाव तालुक्यात पक्षाची महिला आघाडी अधिक मजबूत करून गावागावात पक्षाची शाखा स्थापन करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

भारती गव्हाळे, ऋतुजा गव्हाळे, सोनाली बळीद, रीना पाटोळे, रेश्मा जाधव आणि प्रियंका पठारे यांनी यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई)मध्ये प्रवेश केला. पक्षात नव्याने दाखल झालेल्या सर्व महिला कार्यकर्त्यांचे पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. यावेळी सारिका साळवे, विश्रांती पठारे, संपदा म्हस्के, शीतल नाटिकर, संगीता पाटोळे, गुलाम शेख, विजय शिरसाठ, नईम शेख, लकी वाघमारे, योहान चाबुकस्वार, स्वप्नील साठे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला आघाडीच्या सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमात पक्षाची विचारधारा, सामाजिक बांधिलकी, सामाजिक न्याय, समता आणि महिलांचे राजकीय सक्षमीकरण या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. महिलांनी केवळ सामाजिक उपक्रमांपुरते मर्यादित न राहता राजकीय आणि सामाजिक निर्णयप्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के म्हणाले की, रिपब्लिकन पक्षाची वाटचाल ही सामाजिक न्याय, समता आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठीची आहे. समाजातील सर्व घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटन मजबूत असणे आवश्यक आहे. महिलांचा सक्रिय सहभाग हा कोणत्याही सामाजिक किंवा राजकीय संघटनेच्या यशासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पीटल हे रुग्णांकरीता एक वरदान– उदयोजक अजित बोथरा

## दंतरोग तपासणी व उपचार शिबारात २५० रुग्णांची तपासणी





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सातत्याने आनंदऋषीजी हॉस्पिटल गरीब – गरजू रुग्णांकरीता मोफत शिबीरे घेतात, त्यामुळे रुग्णांकरीता हे एक वरदान ठरत असून ही समाजाच्या दृष्टीने एक चांगली बाब आहे. समाजातील दुःख निवारण्याचे काम जैन सोशल फेडरेशनच्या माध्यमातून हॉस्पिटलच्यावतीने होत आहे. बोथरा परिवाराचा हॉस्पिटलच्या स्थापनेपासून सहभाग आहे आरोग्याच्या या कार्यात बोथरा परिवार सहभागी असल्याचा मनस्वी आनंद होत आहे.या कार्याची व्याप्ती आणखी वाढून त्याचा जास्तीत जास्त गरजूंना लाभ व्हावा, यासाठी हॉस्पिटलने आता यापुढेही अशीच सेवा सुरु ठेवावी, असे प्रतिपादन उदयोजक अजित बोथरा यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन द्वारा संचलित श्री आनंद ऋषीजी हॉस्पिटल अँड हार्ड सर्जरी सेंटर मध्ये राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या १२६ व्या जन्मदिनानिमित्त स्व. लखमीचंदजी बोथरा व स्व. सुशीलाबाई बोथरा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बोथरा परिवाराच्या वतीने आयोजित दंतरोग तपासणी व उपचार शिबिराचे उद्घाटन बोथरा परीवाराच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उदयोजक अजित बोथरा, सौ. प्रतिभा बोथरा, अमन बोथरा,सौ.आकांक्षा बोथरा, सतिश बोथरा,सौ.पूर्वा कोठारी,चि.जैवीक कोठारी,संतोष बोथरा, माणकचंद कटारीया, सतीश लोढा,सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, डॉ. अर्पणा पवार, डॉ. स्वराज ढोले, डॉ. अश्विनी बालगुडे, डॉ. तृप्ती डुंगरवाल, डॉ. प्रणव डुंगरवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

आकांक्षा बोथरा म्हणाल्या रूग्णसेवा हा एक यज्ञ असून तो सातत्याने चालविणे अवघड काम आहे हे अवघड शिवधनुष्य पेलण्याचे काम जैन सोशल फेडरेशनचे सर्व पदाधिकारी आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने करत आहे हे गौरवास्पद बाब आहे. समाजातील प्रत्येक घटकाला योग्य ती सेवा दिली जात आहे जे कार्य केले जाते पूर्ण श्रध्देने व निष्ठेने केले जात आहे. या कार्यात बोथरा परिवाराची पिढी सहभागी होत असल्याने सुख–समाधान–शांती लाभत असल्याचे सांगितले. प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, हे सामाजिक कार्य अजून जोमाने करण्याचा मानस आहे. साामजिक बांधिलकीच्या माध्यमातून अत्याधुनिक मशिनरी व तज्ञ डॉक्टरांमार्फत कमी दरात रुग्णांना सेवा देण्याचा सातत्याने प्रयत्न हॉस्पिटलच्यावतीने सुरु असल्याचे सांगितले. बोथरा परिवार सारखे दानशूर व्यक्तीमुळेच हे शक्य झाले आहे आरोग्याच्या या यज्ञात बोथरा परिवार पुढची पिढी सहभागी झाली आहे

डॉ. अर्पणा पवार म्हणाल्या दंतरोगात वेळेत उपचार घेणे गरजेचे आहे पुढे होणारे धोके त्यामुळे कमी होतात शिबिराच्या माध्यमातून अल्पदरात उपचार होणार आहेत अनेक प्रकारचे आधुनिक मशिनरी, सुपरस्पेशालिस्ट डॉक्टर यात सहभागी असल्याने तुमची योग्य ती काळजी घेतली जाते. सुत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. सतीश लोढा यांनी आभार मानले.

# फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल स्पर्धेत प्रवरा पब्लिक स्कूलचे वर्चस्व

## आर्मी पब्लिक स्कूलची दमदार कामगिरी; विविध वयोगटांतील रंगतदार लढतींनी रंगवला दिवस

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत शुक्रवारी (दि. ७ ऑगस्ट) अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर फुटबॉलचे रंगतदार सामने उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. दिवसभर झालेल्या सामन्यांमध्ये प्रवरा पब्लिक स्कूलने अनेक गटांत दमदार कामगिरी करत एकहाती वर्चस्व गाजवले, तर आर्मी पब्लिक स्कूलनेही प्रभावी खेळाच्या जोरावर महत्त्वपूर्ण विजय मिळवले. अनेक सामन्यांमध्ये खेळाडूंनी हॅट्ट्रिकची नोंद करत प्रेक्षकांचे लक्ष वेधले.





सकाळच्या सत्रात १६ वर्षांखालील मुलींच्या गटात आर्मी पब्लिक स्कूल आणि आयकॉन पब्लिक स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात आर्मी पब्लिक स्कूलने २–० गोलने विजय मिळवला. आर्मी पब्लिक स्कूलकडून सिद्धी पोटे हिने ३३ व्या मिनिटाला गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर भावना हिने आणखी एक गोल करत संघाचा विजय निश्चित केला.

यानंतर प्रवरा पब्लिक स्कूल आणि आठरे पाटील स्कूल यांच्यातील १६ वर्षांखालील मुलींचा सामना चुरशीचा झाला. प्रवरा पब्लिक स्कूलच्या दामिनी जाधव हिने २१ व्या मिनिटाला गोल करत संघाचे खाते उघडले. त्यानंतर संघाने उत्कृष्ट बचावात्मक खेळ करत आठरे पाटील स्कूलला एकही गोल करण्याची संधी दिली नाही आणि प्रवरा पब्लिक स्कूलने १–० गोलने विजय मिळवला.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूलने ऊर्जा गुरुकुलवर ७–० गोलने दणदणीत विजय मिळवला. सामन्याच्या ४ थ्या मिनिटाला धीरज चारस्कर आणि ५ व्या मिनिटाला युवराज आहेर यांनी सलग गोल करत संघाला भक्कम आघाडी मिळवून दिली. त्यानंतर ८, १७ आणि २७ व्या मिनिटाला वैभव कविटकर याने सलग तीन गोल करत हॅट्ट्रिक पूर्ण केली. १० व्या मिनिटाला रणविजय जामकर आणि ४० व्या मिनिटाला मयुर पिंपळे यांनीही गोलांची भर घालत प्रवराचा एकतर्फी विजय निश्चित केला.

१२ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूल आणि ओएसिस स्कूल यांच्यात रंगतदार सामना झाला. प्रवराकडून वरद चौहान याने ४ थ्या मिनिटाला गोल करत आघाडी मिळवून दिली. मात्र १९ व्या मिनिटाला ओएसिस स्कूलच्या आर्यन पंडित याने गोल करत बरोबरी साधली. त्यानंतर प्रवराने पुन्हा आक्रमक खेळ करत २७ व्या मिनिटाला श्रेयश डोईफोडे आणि ४२ व्या मिनिटाला कुनाल कानडे यांनी गोल करत संघाला ३–१ गोलने विजय मिळवून दिला.

दुपारच्या सत्रात १६ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूलने ओएसिस स्कूलवर ७–० गोलने सहज विजय मिळवला. ४ थ्या मिनिटाला अभिनव राऊत याने गोल करत सुरुवात केली. त्यानंतर ११, १२ आणि १७ व्या मिनिटाला रामचंद्र पालवे याने सलग तीन गोल झळकावत हॅट्ट्रिक नोंदवली. २८ आणि ४५ व्या मिनिटाला निखील वायभट याने दोन गोल केले, तर ३५ व्या मिनिटाला प्रविण काळे याने गोल करत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

# नगरमध्ये २२ ऑगस्ट पासून अहिल्या सरस्वती महोत्सवाचे आयोजन

## रविवारी अहिल्यानगर फॅशन रनवेसाठी मेगा ऑडिशन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगरमध्ये महिला सक्षमीकरण आणि त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी भव्य अहिल्या सरस्वती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २२ ते ३० ऑगस्ट २०२६ या कालावधीत होणाऱ्या या महोत्सवात अहिल्यानगर फॅशन रनवे होणार आहे. यासाठी रविवार दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० ते दुपारी ३ या कालावधीत नवीन टिळक रोडवरील पॅराडाईज हॉटेल मागील नंदनवन लॉन्स येथे ऑडिशन होईल. प्रेग्नेंट लेडी वॉक, पॅरेंट ॲण्ड मी वॉक, डॉक्टर्स वॉक आणि ८ वेगवेगळे रनवे सिक्वेन्स यात असतील, अशी माहिती सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. अमोल जाधव यांनी दिली.

देशातील फॅशन विश्वातील अग्रगण्य फॅशन कार्निवलच्या वतीने कल्लाकार कट्टा फॅशन रनवेचे नियोजन करत आहे. त्यामुळे हा कार्यक्रमांतून देश पातळीवरील प्रचलित फॅशन ट्रेंड नगरमध्ये पहायला मिळतील. अहिल्यानगर फॅशन रनवे मध्ये १६ वर्षांपुढील





मुली, महिला सहभागी होऊ शकतील. ऑडिशनसाठी काळा टँक टॉप, ४ किंवा ५ इंची रनवे हिल्स, निळ्या रंगाची डेनिम शॉर्टस किंवा अँकल लेंथ पँट असा ड्रेसकोड आहे. यासाठी मोफत प्रवेश असून नाव नोंदणीसाठी ९७३०२०८०९८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. फॅशन रनवेचा मुख्य इव्हेंट रविवार दि. ३० ऑगस्ट रोजी नवीन टिळक रोडवरील पराडाईज हॉटेल मागील नंदनवन लॉन्स येथे होईल.

सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने नगरच्या सांस्कृतिक क्षेत्रात सातत्यापूर्ण योगदान देत महिलांना निखळ मनोरंजनाचा आनंद मिळण्यासाठी वेळोवेळी विविध उपक्रम राबविले आहेत. नगरमध्ये पहिल्यांदा प्रेग्नेंट लेडी फॅशन रनवे सरस्वती हॉस्पिटलनेच घेतला होता. आता प्रसिद्ध फॅशन कार्निवलच्या माध्यमातून कल्लाकार कट्टा हा भव्य फॅशन रनवे घेत आहे.

अहिल्या सरस्वती महोत्सवाला दि.२२ ऑगस्ट पासून सुरुवात होईल. यादिवशी ताणतणाव, मानसिक स्वास्थ्य आणि जीवनशैलीविषयी मार्गदर्शन केले जाईल. दि. २३ ऑगस्ट रोजी खास महिलांसाठी बाईक रॅली, आई व मी पोर्ट्रेट, माझ्या आयुष्यातील अहिल्या ऑनलाईन व्हिडिओ स्पर्धा, कणखर महिला, आरोग्य जागृती कार्यक्रम होतील. दि.३० ऑगस्ट रोजी मेगा इव्हेंट होईल. यात फॅशन रनवे बरोबरच अहिल्या गौरव पुरस्कार, सरस्वती गौरव पुरस्कार वितरण, प्रेग्नेंट लेडी वॉक, डॉक्टर्स वॉक, पॅरेंट ॲण्ड मी वॉक, डिझायनर फॅशन सिक्वेन्स होईल. याशिवाय महिला सक्षमीकरणावर आधारित नृत्य नाट्य आविष्कार सादर केला जाणार आहे. टॅलेंट, फॅशन, सक्षमीकरण, आरोग्य, मनोरंजन आणि पुरस्कार असा सुरेख संगम असलेला हा महोत्सव मोठी पर्वणी ठरणार आहे. महोत्सवातील सर्व कार्यक्रमांना मोफत प्रवेश आणि सहभाग आहे. जास्तीत जास्त युवती, महिलांनी यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या ‘चूजिंग गोल्ड’या आत्मचरित्राचे प्रकाशन

## १९४ वर्षांच्या वारशाला नवी दिशा देणाऱ्या सहाव्या पिढीतील उद्योजकाचा प्रेरणादायी प्रवास

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित सराफी व्यावसायिक घराण्यांपैकी एक असलेल्या ‘पीएनजी ज्वेलर्स’चा वारसा वयाच्या मध्यतिशीत स्वीकारलेल्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ यांनी आपल्या आयुष्यातील अनुभव, संघर्ष, निर्णय आणि नेतृत्वाचा प्रवास शब्दबद्ध केला आहे. त्यांचे आत्मचरित्र चूजिंग गोल्ड हे पेंग्विन रँडम हाऊस इंडिया यांनी राष्ट्रीय स्तरावर प्रकाशित केले आहे. चूजिंग गोल्ड हे अत्यंत प्रामाणिक आणि वैयक्तिक अनुभवांवर आधारित असे पुस्तक आहे. भारतातील सर्वात जुन्या व्यावसायिक वारशांपैकी एकाचा वारसा तरुण वयात स्वीकारल्यानंतर, आज वयाच्या एकोणपन्नाशीत डॉ. सौरभ गाडगीळ यांनी आपल्या आयुष्याच्या प्रवासाकडे मागे वळून पाहत त्यातील अनुभव, संघर्ष, निर्णय आणि शिकवणी यांचा प्रांजळ वेध घेतला आहे. हा प्रवास बाहेरच्या जगाला दिसणाऱ्या यशाचा नसून, त्यांनी प्रत्यक्ष अनुभवलेल्या वास्तवाचा आणि त्यातून घडलेल्या व्यक्तिमत्त्वाचा आहे. या आत्मचरित्रात डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या आयुष्याला आकार देणारे अनेक महत्त्वाचे क्षण, आजोबा आणि आई यांच्यासोबतचे आयुष्यभर स्मरणात राहिलेले संवाद, काळाच्या ओघात उमगलेल्या गोष्टी तसेच त्यांच्या विश्वास, धैर्य आणि मूल्यांची कसोटी पाहणारे अनेक कठीण निर्णय यांचा प्रामाणिक वेध घेण्यात आला आहे. १९४ वर्षांच्या पीएनजी ज्वेलर्सच्या समृद्ध वारशाची पार्श्वभूमी या कथेला लाभली असली, तरी या पुस्तकाचा केंद्रबिंदू हा स्वतः डॉ. गाडगीळ यांचा व्यक्तिमत्त्व विकास, त्यांचा संघर्ष, त्यांनी घेतलेले निर्णय आणि परंपरेचा सन्मान राखत स्वतः चा स्वतंत्र मार्ग घडवण्याचा प्रेरणादायी प्रवास हा आहे. पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, ‘‘आयुष्य जगताना स्वतःसाठी जो वेळ मिळतो, ज्यात आपण मागे वळून पाहतो, तशी संधी मला कधी मिळाली नाही. या पुस्तकाच्या निमित्तानं पहिल्यांदाच ही संधी मिळाली. स्वतःशी संवाद साधत अनेक





प्रश्नांना या निमित्तानं मला सामोरं जाता आलं. आजपर्यंत मी घेतलेल्या कोणत्या निर्णयांचा मला खऱ्या अर्थानं अभिमान आहे? कोणत्या निर्णयाबाबत आजही मनात सल आहे, कोणते निर्णय अनुभवाच्या जोरावर योग्य ठरले आणि कोणते केवळ नशिबाच्या साथीनं योग्य ठरले. या सगळ्या मला पडलेल्या प्रश्नांना मी दिलेलं प्रामाणिक उत्तर म्हणजे ‘चूजिंग गोल्ड हे पुस्तक. त्यात कोणताही आडपडदा नाही किंवा यशानंतर निर्माण होणाऱ्या परिपूर्णतेचा कोणता आवही नाही.‘‘ ‘‘हे पुस्तक लिहिताना मला सर्वाधिक आश्चर्य वाटले ते म्हणजे माझ्या आयुष्याला आकार देणारे अनेक क्षण किती साधे आणि शांत होते. आजोबांसोबत झालेला एक संवाद, स्वतःपासूनही लपवून ठेवलेले एक अपयश किंवा पंचविशीत दुर्लक्षित केलेला एखादा सल्ला, ज्याचा खरा अर्थ अनेक वर्षांनंतर उमगला. या क्षणांनी मला बॅलन्स शीटमधील आकड्यांपेक्षा अधिक घडवले. हे पुस्तक मी त्या प्रत्येक स्वप्नाळू व्यक्तीसाठी लिहिले आहे, जी कधीकाळी माझ्यासारखीच महत्त्वाकांक्षी होती, पण अनिश्चिततेशी झुंज देत होती; स्वतःहून कधीही न मागितलेल्या अपेक्षांचे ओझे वाहत होती आणि आपल्यात खरंच ते सामर्थ्य आहे का? हा प्रश्न स्वतःलाच विचारत होती. या पुस्तकातून मी यशाचे कोणतेही ठरावीक सूत्र सांगितलेले नाही, कारण यशाला असे कोणतेही एकच सूत्र नसते. मात्र, माझ्या प्रवासातील सत्य अनुभव आणि आयुष्यभर जपलेली मूल्ये मी मनापासून मांडली आहेत. माझी ही कहाणी एखाद्या वाचकाला त्याचा पुढचा कठीण निर्णय अधिक धैर्याने आणि कमी भीतीने घेण्याची प्रेरणा देऊ शकली, तर या पुस्तकाचा हेतू सफल झाला, असे मी मानेन.‘‘ पेंग्विन रँडम हाऊस इंडियाचे लीड – पेंग्विन एंटरप्राइझ, कस्टम पब्लिशिंग, अनुज दत्ता म्हणाले, ‘‘प्रकाशक म्हणून आम्ही नेहमी अशा कथा शोधत असतो, ज्या केवळ यशाची गाथा सांगत नाहीत, तर त्यामागचा खरा प्रवासही उलगडतात. ‘चूजिंग गोल्डबाबत सर्वात विशेष वाटले ते म्हणजे त्यातील प्रामाणिकपणा. सौरभ यांनी केवळ त्यांच्या यशाविषयी लिहिलेले नाही, तर त्यांच्या आयुष्याला आकार देणारे कठीण निर्णय, अपयश आणि आत्मसंशयाचे क्षणही अत्यंत प्रामाणिकपणे मांडले आहेत. त्यामुळे हे पुस्तक केवळ व्यवसायाच्या यशाची कहाणी न राहता नेतृत्व, जिद्द आणि आत्मविश्वासाचा एक अतिशय वैयक्तिक आणि प्रेरणादायी प्रवास बनते. उद्योजक, व्यावसायिक नेते तसेच करिअरच्या कोणत्याही टप्प्यावर असलेल्या प्रत्येक वाचकाला या पुस्तकातील अनुभवांतून नक्कीच प्रेरणा आणि विचारांची नवी दिशा मिळेल.‘‘ ‘चूजिंग गोल्ड हे डॉ. सौरभ गाडगीळ यांनी त्यांच्या आयुष्यातील निर्णय, अनुभव आणि शिकवणींचा प्रामाणिक लेखाजोखा म्हणून लिहिले आहे. हे पुस्तक केवळ दागिन्यांच्या व्यवसायाशी संबंधित वाचकांसाठी मर्यादित नसून, वारशाची जबाबदारी पेलणाऱ्या व्यक्ती, स्वतःच्या बळावर यशस्वी वाटचाल घडवणारे उद्योजक तसेच करिअरच्या प्रत्येक टप्प्यावर आत्मसंशयाशी सामना करणाऱ्या प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरेल. या पुस्तकाचा औपचारिक प्रकाशन सोहळा ६ ऑगस्ट रोजी मुंबई येथे खासगी समारंभात पार पडणार पडला, त्यावेळी डॉ. सौरभ गाडगीळ यांच्यासोबत अभिनेत्री माधुरी दीक्षित विशेष संवाद साधला. या संवादातून ‘चूजिंग गोल्ड या पुस्तकामागील प्रेरणादायी प्रवास, अनुभव आणि त्यातून मिळालेल्या शिकवणीवर प्रकाश टाकला गेला. ‘चूजिंग गोल्ड हे पुस्तक भारतातील सर्व ‘पीएनजी ज्वेलर्स’च्या शोरूममध्ये तसेच . वर उपलब्ध असून, वर प्री–ऑर्डरसाठी खुले आहे. ३१ ऑगस्ट २०२६ पासून हे पुस्तक देशभरातील प्रमुख पुस्तक विक्रेत्यांकडे उपलब्ध होईल. तसेच, याची आवृत्ती देखील लवकरच वाचकांच्या भेटीला येणार आहे.

(पान १ वरुन)

### मनपाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यावर दर्गादायरा परिसरात जीवघेणा हल्ला

त्याच्यावर अज्ञात कारणावरून चौघांनी तलवारीने जीवघेणा हल्ला केला. त्यात गंभीर जखमा झाल्याने त्याला तातडीने शहरातील मॅक्स केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या तो बेशुद्ध अवस्थेत असून हा हल्ला नेमका कोणत्या कारणावरून झाला याचा उलगडा झालेला नाही. पोलिसांनी या पकरणी युनूस शेख या आरोपीला अटक केली असून, उर्वरित आरोपी सिराज अस्लम सय्यद, मेहराज अस्लम सय्यद व मुस्तकीन अस्लम सय्यद या तिघांचा शोध सुरू आहे. सर्व आरोपींच्या अटकेनंतर या संदर्भातील अधिकृत माहिती पोलिसांकडून देण्यात येणार आहे असे सांगण्यात आले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच आमदार संग्राम जगताप यांनी तातडीने जखमी कर्मचाऱ्याची विचारपूस करण्यासाठी मॅक्स केअर हॉस्पिटलला भेट दिली. यावेळी मोठा जमाव जमला होता. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांकडून एसआरपीच्या सह तुकड्या मागविण्यात आल्या असून मुकुंदनगरसह शहरात चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### एलसीबीकडून जामखेड येथे तीन गोवंशीय जनावरांची सुटका

याला ताब्यात घेतले. विचारपूस केली असता त्याने ही जनावरे कत्तलीसाठी बांधून ठेवल्याचे कबूल केले. पोलिसांनी घटनास्थळावरून ६० हजार रुपये किमतीच्या २ गायी आणि २० हजार रुपये किमतीचे १ वासरू असा एकूण ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध जामखेड पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशुसंरक्षण (सुधारित) अधिनियम व प्राण्यांना निर्दयतेने वागवण्यास प्रतिबंध करणाऱ्या कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास जामखेड पोलीस करत आहेत.

### हल्लेखोरांवर कडक कारवाईची मागणी; २४ तासांत कारवाई न झाल्यास मुकुंदनगरमधील नागरी सुविधा बंद करण्याचा इशारा

असलेल्या धीरजसिंग राजपूत यांच्यावर दहा ते बारा जणांनी हल्ला केला असून या घटनेमुळे महापालिका कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शासकीय कामात अडथळा आणणाऱ्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.‘‘कर्मचाऱ्यांवर हल्ले होत असतील तर मुकुंदनगरमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी पाठविणे शक्य होणार नाही. २४ तासांच्या आत हल्लेखोरांवर कारवाई झाली नाही, तर मुकुंदनगर परिसरातील स्वच्छता, पाणीपुरवठा, दिवाबत्ती आणि आरोग्य सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला जाईल,'' असा इशारा बाबासाहेब मुदगल यांनी दिला. महापालिका कर्मचाऱ्यांचे देयके वेळेवर मिळत नसतानाही कर्मचारी जीवाची पर्वा न करता नागरिकांना सेवा देत असल्याचे त्यांनी सांगितले.

सचिव आनंद वायकर म्हणाले की, महापालिका कर्मचाऱ्यांवर जीवघेणे हल्ले होत असतील तर कर्मचाऱ्यांनी नागरिकांना नागरी सुविधा कशा द्यायच्या? कर्मचाऱ्यांची थकीत देयके असतानाही ते शहरातील नागरी सुविधा सुरळीत ठेवण्यासाठी काम करीत आहेत. मात्र, त्यांच्यावरच हल्ले होत असतील तर ही गंभीर बाब आहे. हल्लेखोरांवर तातडीने कारवाई झाली नाही, तर सोमवारपासून महापालिका बेमुदत बंद ठेवण्याचा इशारा त्यांनी दिला.

### सव्वादोन लाखांचे १५ गहाळ मोबाईल मूळ मालकांना परत

अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड, गणेश ठोंबरे, सुनील खैरे, गोकुळ पळसे, राजेंद्र गाडे, अमित बर्डे, बळीराम काकडे, कोमल गोफणे तसेच सायबर सेलचे राहुल गुंडू, अरुण सांगळे व नितीन शिंदे यांच्या पथकाने केली.

### अवघ्या आठ दिवसांत ‘कासारे ते वाघदरा रस्ता’ कामाला सुरुवात

असेही आमदार दाते यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमाला उद्योजक धनंजय निमसे, वसंत दातीर, गारगुंडी माजी चेअरमन रंगनाथ फापाळे ग्रापं सदस्य शैला दातीर, सचिन खरात, संगीता दातीर, ताराबाई खरात, भागुबाई खरात, हिराबाई खरात, इंदुबाई दातीर, नबाबाई दातीर, राहीबाई दातीर, अलका दातीर, सुरेखा पानमंद, उज्वला खरात, सविता दातीर, मंजुळा खरात, जिजाबाई दातीर, रतन दातीर, कांता दातीर, मंगल दातीर, सुमन खरात, उषाबाई दातीर, सिंधू खरात, लताबाई खरात, जनाबाई खरात, शांताबाई दातीर, ज्योत्स्ना चौरे, आशा पाणमंद, हिराबाई कासुटे, लहानुबाई खरात यांच्यासह बाळासाहेब दातीर, संदीप खरात, रामदास खरात, लहू खरात, मारुती खरात, हनुमंत दातीर, बबन दातीर, बाळशिराम दातीर, मिनीनाथ पानमंद, नाना नरड, किसन खरात, भागा खरात, बाबाजी दातीर, विकास दातीर, संतोष पानमंद, सचिन खरात, शरद दातीर मेजर, गोरख दातीर, बाबासाहेब दातीर आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेषतः महिला भगिनींची लक्षणीय उपस्थिती या कार्यक्रमाचे आकर्षण ठरली. काही दिवसांपूर्वी रस्त्याच्या प्रश्नासाठी आमदार दाते यांची भेट घेणाऱ्या महिलांच्या मागणीला अल्पावधीतच मिळालेला प्रतिसाद पाहून ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण होते. ‘‘प्रश्न मांडला आणि अवघ्या आठ दिवसांत काम सुरू झाले,'' यामुळे वाघदरा–कासारे परिसरातील ग्रामस्थांमध्ये आमदार दाते सरांच्या कार्यपद्धतीबाबत सकारात्मक भावना व्यक्त होत होती. ‘‘वाघदरा परिसरातील ग्रामस्थांनी रस्त्याची अडचण आमदार काशिनाथ दाते सरांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी या प्रश्नाची तातडीने दखल घेतली, ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. अवघ्या आठ दिवसांत कासारे ते वाघदरा, वाफारेवाडी शिवरस्ता खडीकरण व मजबुतीकरण कामाला सुरुवात झाल्याने ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. जनतेचा प्रश्न समजून घेऊन तो प्रत्यक्ष कामातून मार्गी लावण्याची आमदार दाते सरांची कार्यपद्धती निश्चितच प्रेरणादायी आहे. या कामासाठी पाठपुरावा करून रस्ता मंजूर करून दिल्याबद्दल आमदार दाते सरांचे आम्ही सर्व ग्रामस्थांच्या वतीने मनःपूर्वक आभार मानतो.''

–धनंजय निमसे, उद्योजक

### विद्यार्थ्यांनी घर व परिसरातील पाणीसाठ्यांची तपासणी करावी - आयुक्त

निर्मिती होत असते. डेंग्यू हा जीवघेणा आजार असून त्याचा प्रसार रोखण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून शहरातील विविध भागांमध्ये नागरिकांमध्ये डेंग्यू आजाराबाबत जनजागृती केली जात आहे. त्याचबरोबर आरोग्य विभागाच्या माध्यमातून नागरिकांच्या घरोघरी जाऊन आरोग्याची तसेच साठविलेल्या पाणीसाठ्यांची तपासणी करण्यात येत असून आवश्यक त्या ठिकाणी औषध फवारणी व धूर फवारणी केली जात आहे.

विद्यार्थी, आशा सेविका आणि आरोग्य सेविकांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती केली जात असून, या अभियानाचे रूपांतर एका लोकचळवळीत झाले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या घरातील तसेच परिसरातील पाणीसाठ्यांची नियमित तपासणी करावी. तसेच आठवड्यातून एक दिवस ‘कोरडा दिवस’ म्हणून पाळावा. विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य आहेत. त्यांचे आरोग्य सुदृढ व निरोगी राहण्यासाठी प्रत्येकाने आपला परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले. नगरसेवक निखिल वारे म्हणाले की, महापालिका आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी व डॉक्टर चांगले काम करीत आहेत. जास्तीत जास्त आरोग्य सुविधा नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करण्यात यावे. महापालिकेच्या माध्यमातून नागरिकांना मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल. तसेच डेंग्यूची तपासणी महापालिकेच्या आरोग्य केंद्रामध्येच उपलब्ध व्हावी, यासाठी प्रयत्न करण्यात येतील. ‘डेंग्यू मुक्त अहिल्यानगर’ अभियानाचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

उपसभापती वर्षा सानप म्हणाल्या की, पावसाळा सुरू झाला की निसर्ग सुंदर होतो; मात्र त्याचबरोबर साथीचे आजारही मोठ्या प्रमाणात पसरतात. यामध्ये मलेरिया, हिवताप व डेंग्यूची लागण नागरिकांना होण्याची शक्यता असते. हे आजार पसरू नयेत यासाठी योग्य ती काळजी व आवश्यक उपाययोजना केल्यास साथीचे आजार रोखता येतात. महापालिका आरोग्य विभागाच्या वतीने ‘डेंग्यू मुक्त अहिल्यानगर’ अभियान सुरू करण्यात आले असून, नागरिकांनीदेखील आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. सृष्टी बनसोडे यांनी विद्यार्थ्यांना डेंग्यू आजाराबाबत प्रात्यक्षिक करून दाखविले. डेंग्यू आजाराची उत्पत्ती कशी होते, डासांची उत्पत्ती होऊ नये यासाठी कोणती काळजी घ्यावी, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. साठविलेल्या पाण्यामध्ये गप्पी मासे सोडावेत, जेणेकरून डेंग्यूच्या डासांच्या अळ्या निर्माण होणार नाहीत, अशी माहिती त्यांनी दिली. आरोग्य सेविका व आशा सेविकांच्या माध्यमातून नागरिकांच्या घरांची तपासणी केली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.